| | | |
|---|---|---|
| | पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड<br>पत्ता : चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,<br>पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३ | |

## प्रे स नो ट

पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात चाकण, भोसरी, तळेगाव हि औद्योगिक क्षेत्रे तसेच हिंजवडी, तळवडे, चिखली ही आयटी पार्क क्षेत्रे असुन देहु व आळंदी हि जगत्गुरु संत श्री तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महराज यांची भुमी असुन पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीत ठेवून गतिमान करणेसाठी पिंपरी चिंचवड वाहतूक शाखा कटिबद्ध आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये सार्वजनिक रस्त्यावर चालणाऱ्या तसेच चालु करण्यात येणाऱ्या खोदकामास पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेकडील ना- हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असल्याने संबंधीत ठेकेदार हे खोदकाम करावयाचे आगोदर वाहतूक शाखेकडील परवानगी मिळणेबाबत इकडील कार्यालयास अर्ज करत असतात, त्यानंतर त्यांना वाहतुक शाखेकडील योग्य त्या अटी व शर्ती घालुन ना-हरकतपत्र देण्यात येत असते.

सदरचे ना-हरकपत्र दिल्यानंतर काम करत असताना वाहतुक विभागाने घालुन दिलेल्या अटी व शर्तीचे पालन ठेकेदार करत नसल्याचे वारंवार दिसुन येत असल्याने तसेच ठेकेदार परवानगी मिळणेबाबत इकडील कार्यालयास अर्ज करुन वाहतुक शाखेकडील परवानगी देण्याअगोदर/ परवानगी न घेता काम चालु करत असल्याचे निदर्शनास येत होते.

पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात दैनंदिन व्हि.व्हि.आय.पी, व्हि.आय.पी यांचे दौरे होत असुन दौऱ्यादरम्यानचा मार्ग हा सुरक्षित व सुरळित असणे अत्यंत महत्वाचे असुन सदर रस्त्यावर वाहतुक विभागाकडील परवानगी न घेता काम केल्याने सदर खोदकामामुळे मोठा अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेअंतर्गत असलेल्या वाहतुक विभागात परवानगी न घेता करण्यात येणाऱ्या खोदकामांची पाहणी करुन गुन्हे दाखल करण्याचे आदेश इकडील कार्यालयाकडुन वाहतूक विभागांना देण्यात आलेले होते.

सदर आदेशाचे अनुषंगाने पोनि देहुरोड वाहतुक विभाग यांनी त्यांचे हद्दीत वाहतुक शाखेकडील परवानगी न घेता मुकाई चौक ते किवळे गाव जाणारे रोडवर खोदकाम करणारे मे लिपारु इन्फ्रा लि या कंपनीचे फारुक खान रा. साईनाथ नगर, निगडी यांचेवर वाहतूक विभागाची परवानगी न घेता सार्वजनिक रस्त्यावर वाहनांना अडथळा होइल अशा प्रकारे खोदकाम केले म्हणुन भा.दं.वि.स कलम २८३, १८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तरी याव्दारे सर्व ठेकेदार/कंत्राटदार यांना अवाहन करण्यात येते की, कोणीही विना परवानगी सार्वजनिक रस्त्यावर खोदकाम करणार नाही. विना परवानगी खोदकाम केल्यास त्यांचेवर वरील कलमांप्रमाणे योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१/१०/२१

(विशाल गायकवाड)
पोलीस उप आयुक्त
वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

Scanned with CamScanner